: प्रकरण तिसरे :

# महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य

: प्रकरण तिसरे :

# महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य

मागील प्रकरणांच्या अभ्यासावरून भारतीय संस्कृती व कुटुंबसंस्था याची कल्पना आलेलीच आहे. वेदकालीन स्त्रियांना पुरूषांबरोबरीचे स्थान होते पण नंतर त्यात कसे बदल झाले मनुस्मृती नंतर स्त्री ला कशा मर्यादा आल्या व स्त्रीच्या स्थानात झालेले बदल याबाही परामर्श घेतलेला आहेच. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीच्या उदयने स्त्रीचा दर्जा आणखीनच कसा खालावत गेला हे ही पाहिलेच आहे.

जुन्या सरंजामी जातीय व्यवस्थेत स्त्रिया, शूद्र व अतिशूद्र यांना शिक्षणाचा हक्क नव्हता. अगदी प्राचीन काळी मातृवंशीय किंवा मातृकेंद्रित समाजात स्त्रियांना महत्वाचे स्थान होते. सिंधू संस्कृतीच्या शहरात स्त्रिया संस्कृतीप्रमुख, विदुषी असल्याचे उल्लेख आहेत. नंतरच्या काळात गार्गी, मैत्रेयी सारखी उदाहरणे आहेत.[1] पण पुढे प्रस्थापित झालेल्या पुरुष प्रधान समाजाला स्त्री शिक्षण पटण्यासारखे नव्हते. बालविवाहाची प्रथा, केशवपन, बालहत्या, पुनर्विवाह प्रश्न, धार्मिक रूढी, घातुक सामाजिक चालीरीती व शूद्रांची सर्वांगीण पिळवणूक व गुलामगिरी, सामाजिक उच्चनीच भाव अशा प्रकारच्या चालीरीती समाजामध्ये सरसावलेल्या होत्या.

ब्रिटीश अंमल येण्यापूर्वी या देशात शिक्षण व्यवसाय नव्हते असे नाही, पण ती सार्वत्रिक नव्हती. उच्चवर्गीय, उच्चजातीय, तसेच व्यापारासारख्या काही 'साक्षर' व्यावसायिक जातीतील मुलांना शिक्षण घेता येत होते. मात्र मुलींच्या शिक्षणाची काहीच व्यवस्था नव्हती. याचा अर्थ असा नव्हे की कोणी स्त्रिया शिक्षित किंवा साक्षर नव्हत्या. काही कुळातील स्त्रियांना लिहीता वाचता येत होते. भास्करचार्यांची मुलगी लीलावती सारख्या काहींचे शिक्षण झालेले असे यात शंका नाही. पण हे सर्व कुटुंबाच्या अखत्यारित

होत असे. [2]

अधुनिक दृष्टीने ज्यास आपण शिक्षण म्हणतो, ते शिक्षण ज्योतीरावांच्या जन्मापूर्वी अस्तित्वात नव्हते. जिथे उच्चवर्णीय वस्ती मोठ्या प्रमाणात असे त्या ठिकाणी काही शास्त्री शाळा चालवत असत. तेथे संस्कृत, व्याकरण. विधी, चिकित्साशास्त्र, ज्योतिष, वेद, अलंकार आणि धर्मशास्त्र यासारखे विषय शिकविले जात. त्यावेळी सर्व सामान्य जातीच्या लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाही अशी समाजात धारणा बनली होती. भारतात इंग्रज राजवट सुरू होण्यापूर्वी जनतेला शिक्षण देण्याचे दायित्व सरकारचे नाही असे मानले जात असे. तेंव्हा धार्मिकसत्ता, राजसत्ता ब्राह्मणांच्या हाती असल्याने फक्त ब्राह्मणांना धार्मिक ग्रंथ वाचण्याचा अधिकार होता. सामान्य जातीच्या व्यक्तीने तसा प्रयत्न केल्यास कठोर शिक्षा दिली जाई. [3]

अशा प्रकारची स्थिती भारतात सर्वत्र होती. स्त्रियांना व सामान्य जातीच्या लोकांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात असे. तथापि, नवीन राज्यकर्त्यांनी नवीन कायदे बनविले. सन 1813 मध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारने असा आदेश जारी केला की ''भारतातील शिलकी महसूलापैकी प्रत्येकवर्षी कमीत कमी एक लक्ष रूपयांची रक्कम वेगळी काढावी. तिचा उपयोग भारतातील प्राचीन वाङ्मयाचे पुनरूज्जीवन नि वृद्धी करण्यासाठी तसेच शिक्षकांना उत्तजन देण्यासाठी भारतातील रहिवाश्यांमध्ये शास्त्रांचे ज्ञान सुरू करून त्याचा प्रसार करण्यात यावा.'' अशा रीतीने भारतात प्रथम 1813 साली शिक्षणाचे दालन सर्वांना खुले झाले. पौर्वात्य पद्धतीच्या शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी वार्षिक अनुदानाची रक्कम विद्यावेतन म्हणून विद्यार्थ्यांना देण्यात येऊ लागली. ब्रिटनमध्येही 1833 सालापर्यंत शाळांना अनुदान देण्याची प्रथा नव्हती.''[4]

भारतात शिक्षण प्रसाराच्या हेतूने स्थापलेली पहिली संस्था म्हणजे 'बॉम्बे नेटिव्ह

एज्युकेशन'. ह्या संस्थेने 1820 साली शाळा उघडल्या. 1821 साली सरकारने पुणे येथे एक हिंदु कॉलेज उघडले. त्यास संस्कृत पाठशाळा म्हणत. त्या शाळेत फक्त ब्राह्मण विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळे. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी 1824 साली पुण्यात मराठी शाळा काढल्या. मुंबई सरकारने जिल्ह्याच्या प्रमुख शहरात आपल्या खर्चाने 1825 च्या सुमारास शाळा काढल्या. बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्य आणि सरकारी शाळांचे कार्य यांचे एकत्रीकरण करून पुढे 1840 साली सरकारने 'शिक्षा मंडळीं ' (बोर्ड ऑफ एज्युकेशन) हि संस्था स्थापन केली.[5]

वरीलप्रमाणे शैक्षणिक परिस्थिती होती. मात्र ब्रिटीश शासनाने मुलींसाठी शिक्षण पद्धती सुरू केली नव्हती. स्त्रीला समाजात स्थान नव्हते की सामाजिक प्रतिष्ठा. अशा स्थितीत काही समाजसुधारक पुढे आले. राजाराम मोहन रॉय यांनीही स्त्री प्रश्नांकडे गंभीरपणे पाहिले होते. स्त्री शिक्षणाचा प्रयत्न 1833 साली पुण्यात झाला. परंतु लोक भयामुळे थोड्याच दिवसात ती शाळा बंद पडली. [6] हि पार्श्वभूमी लक्षात घेता, भटभिक्षुकांनी चालू केलेल्या आरडा ओरडीमुळे इंग्रजी राजवटीने याकडे दुर्लक्ष केले. 19 व्या शतकात स्त्री व शूद्रादी यांचे शिक्षणाचे कार्य करणे कठीणचे होते. पुण्यासारख्या ठिकाणी असे कार्य करणे म्हणजे दिव्यच. कारण पुणे म्हणजे 19 व्या शतकातील भाकड भोंगळ भट- भिक्षुकांचे माहेरघरच होते. त्यामुळे तत्कालीन मिशनरी लोकांनाही स्त्री-शूद्रांना शिक्षण देणे जमले नाही. मिस कुक यांनी 1820 साली बंगालमध्ये काही शाळा चालू केल्या. त्यानंतर त्या 1829 साली मुंबईत आल्या. मि. वुईलसन साहेबांशी लग्न करून मिसेस वुईल्सन बनल्या. मुंबई इलाख्यात त्यांनी सहा शाळा काढल्याची नोंद आढळते. त्या मोठ्या जिद्दीच्या व कल्पक असून ही पुण्यात मात्र त्यांची डाळ शिजली नाही.

1830 साली पुण्यात त्यांनी शनिवार वाड्यात शाळा काढल्याचा दाखला मिळतो. सरकारनेच ही जागा दिली होती. बार्ट फ्रिअर हा मिशनरी म्हणतो, ''या शाळेत फक्त आठ मुली येत होत्या.

त्या 5-6 वर्षापेक्षा मोठ्या नव्हत्या. तरीही त्यांना शिकविण्याचे काम फार गुप्तपणे चाले.'' त्या शाळेत मुली लपत छपत येऊन चोरट्या सारखे निघून जात. ही शाळा कशी बशी 1832 पर्यंत चालली. शेवटी यशस्वी म्हणून गाजलेल्या मिस वुईल्सन ना ती बंद करावी लागली.

त्या दरम्यान नुकत्याचा ख्रिस्ती झालेल्या मोडक नावाच्या व्यक्तीने महारवाड्यात एक मुलींची शाळा काढली. परंतु कर्मठ भट-भिक्षुकांनाही मागे टाकणाऱ्या रूढीप्रिय शूद्र-अतिशूद्रांनी ती बंद करण्यास भाग पाडले. 1844 साली चर्च ऑफ स्कॉटलंड मिशनने मंगळवार पेठेत एक मुलींची शाळा काढली तीत युरोपियन शिक्षिका व पुरेशी साधन सामग्री अशी सर्व सोय होती. परंतु 1947 साली हि शाळा बंद पडली.[7]

अशा प्रकारे 19 व्या शतकाच्या सुरूवातीस कितीही प्रयत्न झाले तरी पुरातन, सनातन वादी विचारसरणीमुळे स्त्रियांसाठी शैक्षणिक चलन सुरू होऊ शकले नाही. पूर्वीपासूनच भारतात धर्म आणि संस्कृतीचा पगडा मोठ्या प्रमाणावर असलेला दिसून येतो. त्यामुळेच धर्माविरूद्ध जाऊन आपल्या मुलींना शाळेत घालण्यात कोणी धजले नाहीत. रूढी, परंपरा मोडण्याचे धाडस कोणी केले नाही. त्यामुळे वरील प्रमाणे स्त्री शिक्षणासाठी केले जाणारे प्रयत्न वारंवार फोल ठरले व पुन्हा स्त्री शिक्षणाची आशा मावळत गेल्याप्रमाणे वाटते.

अशा सर्व स्थितीचा विचार करता त्याकाळातील पुढे आलेले थोर समाजसुधारक म्हणजे जोतिबा फुले. समाजातील प्रत्येक क्षेत्रातील ब्राह्मणांचे वर्चस्व याचे मूळ कशात आहे, शूद्र शतकानुशतके मानसिक गुलामगिरी व दारिद्र्य कसे भोगत राहिले हे त्यांच्या लक्षात आले. ख्रिस्ती धर्मातील मानवतावादाने जोतीरावांच्या विचारात अधिक स्पष्टता व सुसूत्रता आली असेल. पण त्यापेक्षा ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे व्यक्तीत्व आणि कार्यपद्धती याची त्यांच्या मनावर दृढ छाप पडली. कारण त्यांच्याकडून फुल्यांना

मानवतावादी नीतीधर्मांचा रोजच्या रोज प्रत्यय येत होता. [8]

## महात्मा जोतिबा फुले यांचे शैक्षणिक कार्य

जोतीरावांनी इ. स. 1848 मध्ये सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. तो स्त्री शिक्षणानेच. जोतिबा स्त्री शिक्षणाकडेच प्रथम का वळले हाही प्रश्न विचार करण्यासारखा आहे. आपल्या नव्या इमारतीस लागणारा कारागीर पाळण्यापासून तयार झाला पाहिजे आणि जिच्या हातामध्ये पाळणा तिचे तर युगानुयुगे इ ाानाशी वैर आहे !मग हि अर्धी कच्ची पोरे मानवी स्वातंत्र्याचा संदेश घराघरापर्यंत कसे पोहोचविणार ? यासाठी ''आधी पायारे। मग कळस'' या तत्वानुसार कळसांची सारवासारव करण्यापेक्षा पायापासूनच काळजी घ्यावी. [9] असा विचार फुल्यांनी केला. सामाजिक स्थिती आणि निरनिराळ्या ग्रंथाचे वाचन केल्यानंतर जोतीरावांच्या असे लक्षात आले की कोणत्याही सुधारणेचा पाया विद्या होय. कारण विद्या ही राष्ट्राचा प्राण, अखंड जीव आणि माणुसकीची जिवंत ज्योत आहे. म्हणनूच त्यांना वाटले प्रथम शिक्षणाचा प्रसार हा स्त्री वर्गातच करावा. कारण पूर्व काळी कौसल्या, देवकी, कुंती, पार्वती, सीता, द्रौपदी इ. राष्ट्रमाता सुशिक्षित होत्या म्हणून त्यांच्या पोटी वीरपुरुष पैदा झाले. अलिकडील काळातील ची शिवाजी, जॉर्ज वॉशिंग्टन, नेपोलीयन बोनापार्ट इ. जगविख्यात पुरूषांच्या आया सुशिक्षित असल्यानेच ते इतक्या योग्यतेस पोहोचले.[10]

म्हणजे प्रत्येक पुरूष आईच्या तालमीत तयार होतो याला अनुसरुनच देशातील माता प्रथम शिक्षित असण्यास हवे असा दृढ निश्चय होऊनच प्रथम त्यांनी स्त्रीवर्गात शिक्षणाचा प्रसार करण्याचा विडा उचलला. स्त्रिया आपल्या मुलांना दुसऱ्या, तिसऱ्या वर्षात जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजे असतात. अशा विचारात असतानाच फुल्यांनी आपला मित्र गोवंडे याच्या समवेत अहमदनगर येथिल अमेरिकन मिशनमधील मिस फॅरार यांनी चालविलेली शाळा व मुलींना देण्यात येणाऱ्या

तेथिल शिक्षण पद्धत पाहिली. व त्यावर ते फारच खुष झाले. मिस फॅररने हिंदुस्थानात स्त्रीशिक्षणाकडे केल्या जाणाऱ्या, दुर्लक्षाविषयी त्यांच्याकडे खंत व्यक्त केली.[11] या सर्व गोष्टींचा त्यांच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला. आणि त्यांनी स्त्री शिक्षणाची सुरूवात स्वत:च्या पत्नी पासूनच केली. स्त्री शिक्षणाचा भारतातील पहिला प्रयोग आपल्या शेतीवरील आंब्याच्या झाडाखाली महात्मा फुल्यांनी केला. सावित्रीबाई आणि सगुणाबाई क्षीरसागर ह्या या प्रयोगशाळेतील विद्यार्थिनी होत.[12]

महात्मा फुले हे स्त्री शिक्षणाचे महत्व सांगताना असे वाटते की त्यांनी स्त्रीला शिक्षित करण्याचे ठरविले ते कौटुंबिक स्वरुपातच. मुलांचे पालन हे फक्त तिचेच कर्तव्य आहे असाच दृष्टीकोन त्यातून अभिप्रेत असावा पण असे असले तरी त्यांनी त्या काळात स्त्री शिक्षणाची पहिली गरज ओळखून एका नव्या महान क्रांतीकारी पर्वालाच सुरूवात केलेली दिसून येते.

महात्मा फुल्यांनी विद्येचे महत्व ओळखून स्त्री शिक्षणाचे महत्वही जाणले. स्त्रियांना शिक्षण दिल्याने अनर्थ होईल असा समज त्याकाळात होता. त्यामुळे स्त्रियांनी शिकणे म्हणजे महापाप होय. असे समजले जाई पण या रीति मोडून काढण्याचे फुल्यांनी ठरविले. सन 1842 मधील घटना म्हणजे जोतीबांचे वय पंधरा होते. स्वत:च्या शिक्षणाबरोबरच सावित्रीबाई व सगुणाबाई यांना शिकविणे व शेतीकाम असे तिहेरी कार्य अतिशय आनंदाने त्यांनी पार पाडले. दोघींनीही मराठीचे उत्तम ज्ञान अवगत केले. त्यानंतर शिक्षकीपेशाचे प्रशिक्षण घेऊन त्यांनी अध्यापनकलाही साध्य केली. जेम्स मिचेल यांच्या पत्नींनी 1840 साली छबिलदास यांच्या वाड्यात नॉर्मल स्कूल स्थापन केले होते. मिससे मिचलेबाईंनी सावित्रीबाई व सगुणाबाईंची कसून परिक्षा घेऊन नॉर्मल स्कूल मध्ये तिसऱ्या वर्षात प्रवेश दिला. अशा रितीने सावित्रीबाईंचे शिक्षण पूर्ण झाले.[13]

*''आता तरी तुम्ही मागे होऊ नका। धिक्कारूनी टाका मनुमत।।*

*विद्या शिकताच पावाल ते सुख। घ्यावा माझा लेख जोति म्हणे।।*

असा मानवी स्वातंत्र्याचा संदेश सह्याद्रीच्या कडेकपारीतून पोहोचविण्यासाठी पहिले ज्ञान मंदिर उघडले. सन 1848 साली जोतिबांनी मुलींसाठी शाळा स्थापन केली. सर्वंच हिंदुस्थानता मुलींसाठी काढलेली हीच पहिली शाळा होय. पुराणांतरी (प्राचीन काळापासून) शिकलेल्या म्हणून काही स्त्रियांचा उल्लेख असला तरी त्याही वरिष्ट वर्गातीलच आणि त्यांच्यासाठी खास शिक्षण संस्था असल्याचा खात्रीशीर आधारही सापडत नाही. म्हणजे युगानुयुगींची भारतीय स्त्रियांची गुलामी ठोकरणारा हाच पहिला महात्मा होय.[14]

19 व्या शतकातील हिंदु मुलींकरीता पहिली शाळा कलकत्यात 1819 साली तेथील अमेरिकन मिशनने सुरू केली होती. त्याकाळी मुलींना शाळेत आणण्यासाठी शिक्षकाला घरोघरी फिरावे लागत असे. तेही प्रत्येक दिवशी. मुलींनी शाळेत शिकण्यास यावे म्हणून त्यांना विद्यावेतनही द्यावे लागे. ज्या प्रमाणात मुलींना शाळेत आणतील त्याप्रमाणात शिक्षकांना वेतन मिळे. अमेरिकन मिशनने 1840 मध्ये पुणे परिसरात मुलींसाठी शाळा उघडल्या होत्या. त्यामध्ये सुमारे दहा मुली शिकत होत्या. ती ख्रिश्चनी शाळा असल्याने चालू शकली नाही. म्हणूनच स्वतंत्रपणे मुलींची शाळा काढणारे जोतीबा हेच पहिले भारतीय होत. [15]

1848 साल जगाच्या दृष्टीने महत्वाचे ठरले तसे भारताच्या दृष्टीनेही महत्वाचे ठरले. या काळात लॉर्ड डलहौसी ची कारकीर्द होती. रेल्वे, पोस्ट, शिक्षण क्षेत्रात सुधारणा केल्या होत्या. इंग्लंड अमेरिकेमध्ये सामाजिक हक्क, न्यायासाठी चळवळी झाल्या. आणि याच साली फुल्यांनी पुण्यात मुलींची शाळा सुरू करुन नव्या युगाची सुरूवातच केली. ता. 1 जानेवारी 1848 रोजी पुण्यात बुधवार पेठेतील भिडेवाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. तात्यासाहेब भिडे जरी ब्राह्मण असले तरी दयाळू व

उदारमतवादी होते. तात्या भिडे हे फुल्यांचे स्नेही होते. त्यामुळे फुल्यांनी मुलींच्या शाळेची कल्पना त्यांना सांगताच त्यांनी ताबडतोब आपल्या वाड्यातील जागा शाळेसाठी देण्याचे ठरविले. या क्रांतीकार्यास दरमहा पाच रू. देण्याची इच्छा व्यक्त करून प्रारंभिक खर्चासाठी 101 रू. ची उदार देणगी दिली. प्रथम जोतिबांनी आपल्या मित्रपरिवारातील मुलींची नावे शाळेच्या पटावर दाखल केली. 1-1-1848 रोजी दाखल केलेल्या मुलींची नावे पुढील प्रमाणे होती :-

1) अन्नपूर्णा जोशी वय वर्षे 5

2) सुमती मोकाशी वय वर्षे 4

3) दुर्गा देशमुख वय वर्षे 6

4) माधवी थत्ते वय वर्षे 6

5) सोनू पवार वय वर्षे 4

6) जानी करडिले वय वर्षे 5

या सहा मुलींपैकी 4 ब्राह्मण, 1 धनगर व 1 मराठा अशा मुली होत्या. [16] अशा रितीने मुलींची पहिली शाळा सुरू झाली. पण या कार्याला समाजातील काही थरांचा होताच. प्रथम फक्त सहा मुलीच होत्या. यावरुन असे दिसते की पालक शाळेत मुलींना पाठविण्यास घाबरत होते. सनातन्यांकडून शिव्याशाप घेण्याचे धाडस कुणी करण्यास तयार नव्हते. या शाळेत ब्राह्मणांच्या मुलीच मोठ्या संख्येत असलेल्या दिसतात. जोतिबांना आणि सावित्रीबाईंना पालकांच्या भेटी घेवून, समजावून सांगून त्यांची अनुकुल मते बनवावी लागली. अशाप्रकारे मुलींची संख्या हळूहळू वाढू लागली. विद्यार्थिनींची संख्या वाढल्याने सहाय्यक शिक्षकाची गरज भासू लागली. विनावेतन त्यागबुद्धीने काम करणारे शिक्षक मिळणे

दूरच. मात्र विष्णूपंत थत्ते नावाच्या परोपकारी गृहस्थाने शिक्षक म्हणून काम करण्यास अनुमती दिली. [17]

महात्मा फुल्यांना त्यांच्या कार्यात मदत करणारे त्यांचे मित्र हे ब्राह्मण होतेच. शिवाय त्यांच्या शाळेत प्रथम ब्राह्मण मुलीच संख्येने जास्त होत्या. यावरुन असे दिसते की, महात्मा फुल्यांच्या विरोध हा ब्राह्मण लोक किंवा ब्राह्मण समाजाला नव्हता. तर ब्राह्मण वाद्याला होता. त्यांच्यातील रूढी, प्रथा, परंपरा, पद्धती यामुळे इतर वर्गांवर होणाऱ्या अन्यायाला होता.

जोतिबांचे शैक्षणिक कार्य म्हणजे हिंदुधर्मावर रानटी हल्ला आहे, असे पुण्यातील सनातनी ब्राह्मणांना वाटले. त्यांनी फुल्यांना अनेक प्रकारे त्रास देण्यास सुरूवात केली. त्यांनी फुल्यांच्या जातभाईंकडून त्यांना 'तुमच्या कृत्याचे परिणाम तुम्हाला भोगावे लागतील' असे धमकाविले. मात्र त्यांच्या धमक्यांनी ते तसूभर ही डगमगले नाहीत. उलट त्यांनी केलेल्या आणखी एका गोष्टीमुळे सनातन्यांची माथी भडकली, ती म्हणजे आपल्या पत्नीला त्यांनी मुलींना शिकविण्यासाठी सहायक शिक्षक म्हणून शाळेत आणले. त्याकाळात हिंदुस्त्रीने शिक्षिकेचे काम करणे म्हणजे समाजद्रोही, धर्मद्रोही घटना मानण्यात आली. त्यामुळे सनातन्यांनी सावित्रीबाईंना त्रास देण्यास सुरूवात केले. प्रतिदिनी सावित्रीबाईंना शाळेत जाताना चिखल फेकून घेण्याचे, घाण टाकून घेण्याचे, दगड मारून घेण्याचे दु:ख सहन करावे लागले. पण जोतिबा बंडखोर असल्याने त्यांची प्रतिभा आणि पराक्रम ही सडलेल्या चालीरिती आणि देशकालाला प्रतिकूल असणाऱ्या सामाजिक परंपरा यांच्याविरूद्ध बंड करून उठली होती. हिंदू समाजात नियंत्रण राखण्याच्या बाबतीत निपून असलेल्या ब्राह्मणांनी मात्र आपला मोर्चा गोविंदराव फुल्यांकडे वळविला. आणि त्यांच्यावर सामाजिक दडपण आणले. तुझ्या मुलाने आणि सुनेने समाजाला आणि धर्माला काळीमा लावला आहे. तेव्हां देवाच्या आणि धर्माच्या नावाने तुला आम्ही अशी आज्ञा देतो की तू जोतिबाचे कार्य थांबव, नाहीतर घरातून त्यास हाकलून दे. त्यांच्यावर असे सामाजिक दडपण आणताच ते घाबरले. आणि जोतिबांना त्यांनी

सांगितले 'शाळा तरी सोड किंवा घर तरी सोड.' तेव्हा अत्यंत दु:खी अंत:करणाने जोतिबांनी पित्याला स्पष्टपणे सांगितले, ''मजवर मरण ओढवले तरी माझे हे कार्य मी सोडणार नाही. गोविंदराव खिन्नतेने म्हणाले, ''तर मग तुझा मार्ग तुला मोकळा आहे. तू आपल्या बायकोला घेऊन कुठेही जा, तुझ्या बायकोला माझ्या घरात मी ठेवू शकत नाही.''

जोतिबांची शाळा आणि त्यांचे शैक्षणिक कार्य जवळजवळ पाचसहा महिने चालले त्यांचे स्नेही गोवंडे हे अहमदनगरहून मुलींसाठी स्वखर्चाने पुस्तके पाठवित. परंतु जोतिबांच्या वडिलांनी त्यांना पत्नीसहीत घराबाहेर काढल्यामुळे त्यांची ती शाळा फार दिवस चालली नाही. जोतिबांना आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे साधन पाहणे भाग पडल्याने त्यांना ती शाळा बंद करावी लागली. आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर फुल्यांनी ती शाळा जुनागंज पेठेत सदाशिवराव गोवंडे यांनी दिलेल्या जागेत पुन्हा सुरू केली.[18] हे पहिल्यावहिल्या शाळेचे यश पाहून फुले दांपतीला खूप आनंद झाला. व हीच त्यांची प्रेरणा ठरून त्यांनी 15 मे 1848 रोजी पुण्यात महारवाड्यात मुलामुलींसाठी एक शाळा सुरू केली. या शाळेवर सगुणाबाई उर्फ आऊ यांची सुरूवातीला नेमणूक झाली. त्यानंतर सावित्रीबाईही येथे काम करू लागल्या.[19]

शिक्षण क्षेत्रामध्ये दोन वर्षापेक्षा अधिक काळ कार्याचा अनुभव घेतल्यानंतर जोतीबांनी बुधवार पेठेतील चिपळूणकराच्या वाड्यात 3 जुलै 1851 रोजी मुलींची शाळा काढली. त्या शाळेत जोतीबा विनावेतन दिवसातून चार तास शिकवीत असत. महारमांगाच्या शाळेतून सावित्रीबाईंना या शाळेत आणण्यात आले. पहिल्याच दिवशी पटावर 8 मुली होत्या. त्यांची संख्या लवकरच 48 झाली. कमी वेतन मिळत असल्याने शिक्षक मधून मधून शाळा सोडून जात. शाळेतील मुख्याध्यापिका सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाच्या सुधारणेसाठी जीवीत समर्पित करण्याचे ठरविले.

मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले यांचा याही शाळेत जाता-येताना छळ झाला. त्यांना

घराकडून शाळेत नेण्यासाठी व शाळेतून घरी पोहोचविण्यासाठी संस्थेने एका शिपायाची नेमणूक केली. अशीच सोय शाळेतील मुलींसाठीही केली. त्यांना खेळणी, खाऊचे प्रलोभन व कपडेही द्यावी लागत. कोणत्याही परक्या माणसाला अनुमती शिवाय शाळेला भेट देण्याची परवानगी नव्हती.

आपल्या संस्थेच्या विद्यमाने जोतीबांनी 17 सप्टें. 1851 रोजी रास्तापेठेत मुलींची दुसरी शाळा काढली. आणि 15 मार्च 1852 रोजी वेताळपेठेत मुलींची तिसरी शाळा काढली. दादोबा पांडुरंग तर्खडकर हे त्या काळी सरकारी देशी शाळांचे पर्यवेक्षक होते. त्यांनी वर उल्लेखलेल्या पहिल्या शाळेची परिक्षा 16 ऑक्टोबर 1851 रोजी बुधवारपेठेत घेतली. चालकांना भूषणावह अशी थोड्या काळात शाळेने चांगली प्रगती केली आहे. असा अभिप्राय व्यक्त केला. पुणे महाविद्यालयाचे पर्यवेक्षक मेजर कँडी यांनी आपल्या वृत्तांतात म्हटले की, ''शाळेतील मुलींची बुद्धीमता आणि प्रगती पाहून मला फार समाधान झाले.[20] आता फुले दंपतीच्या शिक्षणप्रसारास चांगलीच चालना मिळाली होती. अल्पावधीतच त्यांनी पुणे व परिसरात एकापाठोपाठ एक शाळा उघडून मुलामुलींच्या शिक्षणास ऐतिहासिक चालना दिली. या शाळांचा तपशिल थोडक्यात पुढीलप्रमाणे,

| शाळा ठिकाण | तारीख सन |
|---|---|
| 1) भिडेवाडा, पुणे | 1-1-1848 |
| 2) महारवाडा, पुणे | 15-1-1848 |
| 3) हडपसर, जि. पुणे | 1-9-1848 |
| 4) ओतूर, जि. पुणे | 5-12-1848 |
| 5) सासवड, जि. पुणे | 20-12-1848 |

| | |
|---|---|
| 6) आल्हाटाचे घर, कसबा, पुणे | 1-7-1849 |
| 7) नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा | 15-7-1849 |
| 8) शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा | 18-7-1849 |
| 9) तळेगाव दमढेरे, जि. पुणे | 1- 9- 1849 |
| 10) शिरूर, जि. पुणे | 8-9-1849 |
| 11) अंजीरवाडी, माजगाव | 3-3-1850 |
| 12) करंजे, जि. सातारा | 6-3-1850 |
| 13) भिंगार | 19-9-1850 |
| 14) मुंढवे-जि. पुणे | 1-12-1850 |
| 15) आण्णासाहेब चिपळूणकर वाडा, पुणे. | 3-7-1851 |
| 16) नानापेठ, पुणे | 1-12-1851 |
| 17) रास्तापेठ, पुणे | 17-9-1851 |
| 18) वेताळ पेठ, पुणे | 15-3-1852 [21] |

एकोणिसाव्या शतकात चार वर्षामध्ये इतक्या शाळा चालू करणे हे देशातील एकमेवच उदाहरण असेल. ही यशस्वीता शतकात स्त्री व शूद्र यांच्यासाठी शाळा सुरू करून चालविण्याचे प्रयत्न कसे फोल ठरले यावरुनच दिसून येते. इ. स. 1849 मध्ये 'स्टुडंटस् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी' ने मुंबईत मराठी मुलींसाठी तीन आणि पार्शी मुलींसाठी चार अशा एकूण सात शाळा काढल्या होत्या. या

कामात दादाभाई नौराजी, नारायण दिनानाथजी, महादेव शास्त्री, कोल्हटकर, भास्कर दामोदर पाळंदे यासारख्या लोकांनी पुढाकार घेतला होता.[22]

काही तरूण महिला जोतीबांच्या महारमांग मुलींच्या शाळेत जाऊ लागल्या. पण मुलांबरोबर बसण्यास त्यांनी नापसंती दर्शविली. म्हणून मुली वेगळ्या करून त्यासाठी एक नवीन शाळा उघडण्यात आली. यासंबंधी 'पूना ऑबझर्व्हर' या इंग्रजी पत्राच्या 21 ऑगस्ट 1852 च्या अंकावरून असे दिसते की, 'जोती गोविंद फुलेंनी वेताळ पेठेत दोन शाळा काढल्या आहेत. महार मांगधेड चांभार यांच्या मुलींसाठी व दुसरी याच जातींच्या मुलांसाठी. या शाळांचा खर्च जोती स्वत: पदरमोड करून करतात. युरोपियन व सुसंस्कृत देशी लोक वर्गणी पाठवितात. या शाळांना दक्षिणा पारितोषिक समितीकडून महिना 25 रू. चे साह्य मिळते. त्या शाळेतील विद्यार्थ्यांनी आपणसाठी एक वाचनालय असावे अशी इच्छा प्रकट करताच, वाचनालय स्थापण्यासाठी तनमनधन अर्पण करून त्याही कार्यात यश मिळविले.[23]

यापैकी प्रत्येक शाळा काढताना अनंत अडचणी, सामाजिक प्रतिकूलता, आर्थिक चणचण अशा सर्व संकटांवर मात करून चालविलेल्या आढळतात. स्त्रीशिक्षण व शूद्र-अतिशूद्र शिक्षणास फुल्यांनी सर्वात जास्त महत्व दिल्याचे दिसून येते. शिक्षणास समाजपरिवर्तनाचे महत्वाचे साधन मानणारे पहिले भारतीय तज्ञ म्हणून फुल्यांना म्हटले पाहिजे. त्यांनी फक्त शाळाच सुरू न करता सर्व स्तरातील लोकांना शिक्षणांचे महत्व पटवून देण्यासाठी 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथाच्या प्रारंभीच त्यांनी म्हटले आहे,

*विद्येविना मति गेली, मतीविना नीती गेली*

*नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले*

*वित्ताविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले।''[24]*

महात्मा फुल्यांचे हे तत्व वास्तवास धरून लौकीक असेच आहे. शिक्षणाशिवायचे अंतिम सत्यच त्यांनी कथित केले आहे. कारण 1998 चे नोबेल पारितोषिक मिळालेले प्रो. अमर्त्यसेन यांनीही भारतातील शिक्षणविषयी खंत व्यक्त केली, आजही आपला भारत अज्ञान, अंधकारात आहे. असे उद्‌गार त्यांनी काढले. म्हणजे 125 वर्षापूर्वी महात्मा फुल्यांनी शिक्षणाशिवायचे अंतिम सत्य सांगितले ती स्थिती आजही आहे. हेच यावरून दिसून येते.

1834 मध्ये लॉर्ड मेकॅलो यांनी शिक्षण विषयक एक सिद्धांत मांडला. शिक्षण समाजातील वरच्या थरात दिले जावे. आणि तेथून ते खालच्या थरापर्यंत यावे. भारतातील विद्वान मंडळी प्रभावित झाली. नंतरच्या काळात फुल्यांनी यास विरोध केला ते म्हणाले, ''आमच्या जातीबद्ध समाजामध्ये हा सिद्धांत यशस्वीरितीने कार्य करू शकणार नाही. शिक्षणाचा प्रसार व्हावयाचा झाला तर आम्हाला ग्रामीण भागातील सक्तीच्या मोफत शिक्षणापासून सुरूवात केली पाहिजे. शिक्षण हे वरून खाली झिरपत जाईल हा विचार अवास्तव आहे. शिक्षण प्रसाराला सुरूवात तळापासून केली पाहिजे. ते खालून वर गेले पाहिजे.'' सर्वसाधारण जनतेस विद्यार्जनापासून वंचित करण्याचाच या पाठीमागे डाव होता. आणि म्हणूनच ब्रिटीश सरकारच्या 'हंटर कमिशनला' या संदर्भात सादर केलेल्या अहवालात हा सिद्धांत भारतीय समाजासाठी किती निरूपयोगी आहे हे दाखवून दिले.[25]

यावरूनच शिक्षणाबाबतची फुल्यांची दूरदृष्टी दिसून येते. यातूनच त्यांच्या मनात स्त्री-शूद्र अतिशूद्रांविषयीची तळमळ दिसून येते. शैक्षणिक कार्य पार पाडीत असताना स्त्री शिक्षिका मिळणे कठीण होते. फतिमा शेख यांनी सावित्रीबाईंबरोबर शिक्षिका म्हणून उत्तम काम केले आहे. फुले दंपतीने शिक्षिका तयार करण्यासाठी जे नॉमर्ल स्कूल काढले त्यामधून प्रशिक्षित झालेल्या पहिल्या विद्यार्थिनीं व पहिल्या शिक्षिका म्हणजे फतिमा शेख. तसेच एकोणिसाव्या शतकातील त्या भारतातील पहिल्या मुस्लीम

स्त्री शिक्षिका होत. [26]

अशा प्रकारे शाळा सुरू करणे त्यासाठी मुलींना आणणे, त्यांना टिकवून धरणे व शिक्षक-शिक्षिका मिळवणे हे काम अत्यंत जिकिरीचे होते. फुले दांपत्यांनी त्यावरही यशस्वी मात केली. पुण्यामध्ये मिशनऱ्यांना मुलींच्या शाळा चालविण्याबाबतीत पूर्ण पराभव पत्करावा लागला तरी त्याच समाजव्यवस्थेत फुले दंपतीने हे कार्य पुण्यामध्ये यशस्वी करून दाखविले. सावित्रीबाईंनी शाळा चालविण्याचे त्या काळात दिव्यच करावे लागले. एक स्त्री शिक्षिका म्हणून काम करताना माणुसकीला लाजवेल असा जो छळ झाला, त्रास झाला त्याला खंबीरपणे आणि धैर्याने, जिद्दीने तोंड दिले.

जोतिबांच्या शाळेची 17 फेब्रुवारी 1852 रोजी प्रकटपणे परीक्षा घेण्यात आली. तो समारंभ पाहण्यासाठी नागरिकांची प्रचंड गर्दी जमली होती. याविषयी भाऊसाहेब मांडे यांनी भाषणात आपले मत व्यक्त करताना म्हटले की, आज या समारंभला जे नागरिक जमले आहेत त्यांना अद्याप स्त्री शिक्षणाचे महत्व कळले नाही हे याविषयी मला वाईट वाटते. तर ब्राऊन नावाच्या न्यायाधिशांनी म्हटले की, ''जर स्त्रियांनी शिक्षण घेतले तर घरातील सुख आणि उपयुक्तता यांची वृद्धी होईल. देशातील निदान काही लोक तरी योग्य दिशेने विचार करीत आहेत आणि देशाचा उद्धार करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, हे पाहून मला समाधान वाटले.''[27]

जोतिबांच्या महारमांग मुलींच्या शाळेतील एका चौदा वर्षाच्या मांग मुलीने जो निबंध लिहीलाआहे तो पाहता जोतिबांच्या अध्यापनातील वैशिष्ट्य कळून येईल. जोतिबांच्या शाळेत तीन वर्षे अभ्यास केलेली ती मुलगी आपल्या निबंधात वर्णन करताना म्हणते ते थोडक्यात असे, 'ब्राह्मणांसाठी वेद आहेत त्याप्रमाणे वर्तन करणे ब्राह्मणांचे काम पण आम्हास धर्मपुस्तक नसेल तर हे भगवान तुजकडून आलेला कोणता धर्म तो आम्हासं कळीव, म्हणजे आम्ही सर्व त्याच्या सारिख्या रीतिने अनुभव घेऊ.

महार अथवा मांग कोणी तालीमखान्यापुढून गेल्यास शिराचा चेंडू व तलवारीचा दांडा केला जाई. असे असताना कोणास वाचता येते हे बाजीरावास कळले तर तो त्या महार मांगास शिक्षा करी. पुढे इंग्रज सरकार विषयी त्या मुलीने आपल्या निबंधात म्हटले आहे की, इंग्रज सरकारमुळे तालीमखान्याजवळ गुलटेकडी बाजारात फिरण्याची मोकळीक झाली, जुलमी बिगार बंद झाली, दु:खे निवारण झाली. अशा आशयाचा त्या मुलीचा निबंध ऐकून 'ज्ञानोदयाने' असे म्हटले की, ''राजश्री जोतिबा माळी, पुण्याच्या अतिशूद्रांच्या शाळेचे स्थापक, यांनी त्या मुली कडून तो आमच्यापुढे वाचविला. त्यावेळी राजश्री जोतिबा यांनी मन:पूर्वक केलेल्या श्रमाचे फळ आमच्या दृष्टीस पडले.

जोतिबांची अखंड, उद्योगशिलता, अलोट प्रेम आणि सतत जागरूकता यामुळे शाळेची प्रतिष्ठा वाढली. आणि पुण्यातील सरकारी मराठी शाळांपेक्षा जोतिबांच्या शाळांचा अधिक नावलौकिक झाला. सरकारी शाळांची जोतिबांच्या मुलींच्या शाळांबरोबर तुलना करून 'पूना ऑब्झर्व्हर' मध्ये, संपादकाच्या एका मित्राने असे मत व्यक्त केले आहे की, ''जोतिबांच्या शाळेतील मुलांची पटसंख्या सरकारी शाळांतील पटसंख्येपेक्षा दहा पटीने मोठी आहे.''[28]

अशा पद्धतीने फुल्यांच्या शैक्षणिक कार्याची उत्तरोत्तर प्रगति होत होती. हळूहळू त्यांच्या कार्याला चालना मिळत होती. शैक्षणिक क्षेत्रातील जोतिबांचा त्याग आणि कष्ट याविषयी सर्व महाराष्ट्रात बोलबाला झाला होता. त्यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती लंडनमधील कंपनी सरकारला यापूर्वीच राज्यपालांनी पाठविली होती. सरकारी शिक्षा मंडळीने जोतिबांच्या कार्याकडे सरकारचे लक्ष वेधले होते आणि त्यांनीच जोतिबांच्या सत्काराविषयी सुचविले होते. सरकारने ती सूचना आनंदाने मान्य करून 193 रू. च्या दोन शाली विकत घेतल्या आणि आपला प्रतिनिधी म्हणून पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर कँडी यांना ती महावस्त्रे समारंभपूर्वक अर्पण करण्याची आज्ञा केली.

जोतिबांच्या गौरवार्थ विश्रामबागवाड्यात 16 नोव्हेंबर 1852 रोजी सरकारने देशी सरदार आणि प्रमुख लोक यांची सभा बोलविली. मेजर कँडीनी सरकारी शिक्षा मंडळाचे निवेदन प्रथम वाचून दाखविले. भाषणाच्या शेवटी त्यांनी सरकारच्या वतीने जोतिबांना शालजोडी सन्मानपूर्वक अर्पण केली. जोतिबांचे सहकारी व स्नेही बापूरावजी मांडे आणि पुणे महाविद्यालयाचे मुख्य पं. मोरेश्वरशास्त्री यांनी जोतिबांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा गौरव केला. त्यावेळी मुलींच्या एका वर्गाची परिक्षा घेण्यात आली. तीत मुलींची प्रगती दिसून आली. जरी जोति गोविंद फुले हे एकटेच शिक्षणकार्याच्या आघाडीवर दिसत होते, तरी त्यांना पुण्यातील काही तरूण उत्साहाने पाठींबा देत होते. जोतिबांसारख्या एका ब्राह्मणेत्तराचा सत्कार पेशव्यांच्या वाड्यात पाहून ब्राह्मणांना ही कल्पना असह्य वाटली असेल.

मुलींच्या शाळा काढून जोतिरावांनी स्त्री शिक्षण क्षेत्रात जे प्रंचड कार्य केले होते त्या विषयीच हा त्यांचा सत्कार झाला होता. त्यांच्या ज्या मित्रांनी त्यांना धैर्याने पाठिंबा दिला होता, त्यांच्या जीवनातील हा एक सोन्याचा दिवस होता. हिंदी स्त्रियांच्या शिक्षणाच्या इतिहासातील हा एक सुवर्णदिन होता. [29]

पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत कित्येक शतके अज्ञानाच्या अंध:काराने घेरलेल्या स्त्रियांना सर्वप्रथम मुक्त करणारे महात्मा जोतिराव फुले हेच होत आणि म्हणूनच म्हटले जाते,

पहिल्यांदा प्रणाम करा जोतिरावांना
ज्यांनी जन्म दिला स्त्री मुक्तीला।[30]

**महात्मा जोतिबा फुले नंतरचे शिक्षण सुधारक :-**

19 व्या शतकाच्या अटीतटीच्या समाजव्यवस्थेत स्त्रीशिक्षणाचे बीज रोवण्याचे जे कार्य

फुल्यांनी केले आहे त्याला फळ आल्यावाचून राहिले नाही. 19 व्या शतकाच्या शेवटीस उदयास पावलेले दोन शिक्षण सुधारक म्हणजे महर्षी धोंडो केशव कर्वे व कर्मवीर भाऊराव पाटील. महात्मा जोतिराव फुल्यांच्या पश्चात त्यांच्याप्रमाणेच कार्य पुढे चालू ठेवणारे हे दोन समाजसुधारक होत. स्त्री शिक्षणाचा वारसा चालू ठेवलेल्या या दोन महान हस्ती होत.

**महर्षी धोंडो केशव कर्वे (जन्म 1858 मृत्यु 1962) :-**

कर्वे यांचे जीवन म्हणजे सर्वसामान्यपणे सामाजिक सुधारणेसाठी आणि विशेषत: स्त्री शिक्षणासाठी अक्षरश: वाहिलेले आधुनिक ऋषीचे जीवन होय. कर्वे प्राथमिक शाळेत असताना त्यांना लाभलेले सोमण गुरूजी म्हणजे त्याच्या मनाला सुयोग्य आकार देणारी एक व्यक्ती होय. त्यांच्याकडूनच समाजसेवेचा पहिला धडा कर्वेंना मिळाला. त्याप्रमाणे निरक्षर प्रौढांना वर्तमानपत्रे वाचून दाखवून समाजसेवा करण्याचा श्रीगणेश कर्वे यांनी प्राथमिक शाळेतूनच गिरविला. [31] 1884 साली गणित घेऊन पदवीधर झालेल्या कर्वेनी शिक्षकी पेशा स्विकारला. 1891 साली फर्ग्युसन कॉलेजात रूजू झाले. त्यांनी त्यापूर्वी कॅथड्रल गर्ल्स हायस्कूल आणि अलेक्झांड्रा गर्ल्स हायस्कूल येथे पार्टटाईम नोकरी करीत. फर्ग्युसन कॉलेजात 1891 पासून 1914 पर्यंत तेवीस वर्षे कार्य केले. याच कालावधीत कर्वेंना आपले जीवित कार्य मिळाले आणि त्यानुसार त्यांनी स्त्री उद्धाराच्या प्रयत्नास सुरूवात केली. [32]

स्त्रीजातीविषयी वाटणारी करूणाच कर्वे यांच्या सामाजिक कार्याची चालना होय. 1914 मध्ये निवृत्तीनंतर आपला सर्व वेळ समाजसेवेसाठी वेचण्याचा त्यांनी निर्णय घेतला. या गोष्टीने प्रेरित होऊन त्यांनी पुणे येथे पेरुच्या गेटाजवळ गोरे यांच्या वाड्यात अनाथ बालिकाश्रम सुरू केले. 1900 साली आश्रम हिंगण्याला नेण्यात आला. या आश्रमाचे मुख्य उद्देश्य होते ते म्हणजे, हिंदूच्या जातीत विधवाविवाह रूढ नाही, त्या जातीतील अल्पवयस्क विधवांना शिक्षण देऊन, त्यांची मने सुशिक्षित करून त्यांना स्वावलंबी

होता येईल असे साधन हस्तगत करून देणे.[33]

त्यांनी समाजातील स्त्रियांची स्थिती पाहिली. त्या काळी विधवांची स्थिती खेदजनकच होती. यासाठीच कर्वे यांनी प्रथम विधवांच्या शिक्षणात आणि सार्वत्रिक उद्धाराच्या कार्यात लक्ष घातल्याचे दिसून येते.

स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हे अत्यंत पवित्र कार्य आहे अशी कर्वेंची श्रद्धा होती. आणि या वृत्तीतूनच 4 मार्च 1907 साली हिंगण्यात महिला विद्यालयाची स्थापना केली. पुढे सन 1915 साली कर्वे यांनी राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षस्थानी बोलताना स्त्री विद्यापीठाची कल्पना बोलून दाखविली त्याप्रमाणे 3 जून 1916 महिला विद्यापीठाची स्थापना केली. त्याची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात अशी -

1) स्त्रियांच्या शिक्षणातील इंग्रजी भाषेच्या अडचणींमुळे त्यांनी त्यांच्या स्त्री विद्यापीठामध्ये मातृभाषेचा शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकार करण्याचे ठरविले.

2) इंग्रजी भाषेच्या महत्वावरून इंग्रजी अध्यापनाची सोय विद्यापीठात करण्यात आली.

3) स्त्रियांच्या व्यक्तीमत्व विकासास अनुरूप व त्यांच्या भावी विकासास पोषक असे विषय सक्तीचे करण्यात आले होते.

4) स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक व्यक्तीभेदास अनुसरून अध्ययन विषयता विविधता आणण्याचा प्रयत्न केला होता.[34]

हे महिला विद्यापीठ म्हणजे भारतीय जीवनातील विशेषत: स्त्री जीवनातील हि महत्वाची घटना आहे. आणि महाराष्ट्रासाठी तर अत्यंत अभिमानी आहे. अशाच प्रकारे आपले कार्य पुढे चालू ठेवत

त्यांनी जून 1917 ला अध्यापिका शाळेची स्थापना केली तर एप्रिल 1918 ला पुणे कन्याशाळेची स्थापना केली.[35]

अशा रीतिने एका स्त्रीला शिक्षण देणे म्हणजे सर्व कुटुंबाला शिक्षण देणे होय. या विचाराने प्रेरित होऊन महाराष्ट्रात प्रथमच स्त्रीशिक्षणाला वाचा फोडणारे महात्मा फुले यांच्या नंतर महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाचा बहुमान कर्वे यांनाच दिला पाहिजे. शिक्षणात यश मिळविल्यानंतर कर्वेनी खेड्यात शैक्षणिक संस्था सुरू करण्याची जबाबदारी स्विकारली. बहुजन समाजातील स्त्री जोपर्यंत सुशिक्षित होत नाहीत. तोपर्यंत जातिभेद अंधश्रद्धा व परंपरागत मताचे परिवर्तन करणे शक्य होणार नाही यासाठी स्त्रीशिक्षणाचे केंद्र पुण्यासारखे एखादे शहर न ठेवता हिंगणे, वाई व सातारा या सारख्या खेडेगावापर्यंत त्यांनी स्त्री शिक्षणाचे लोण पोहोचविले. यातच त्यांच्या शिक्षण कार्याचा दृष्टेपणा सामावलेला आहे.[36]

**कर्मवीर भाऊराव पाटील (जन्म 1887 मृत्यु 1959) :-**

शिक्षणाची उपाधी, सत्तेची ऊब व परंपरेची कुबडी यापैकी कशाचाच मळवट कपाळी न भरता सेवेच्या, त्यागाच्या आणि कष्टाच्या बळावर महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या असंख्या लोकांना अज्ञानाच्या शृंखलेतून मुक्त करणारा एक थोर महात्मा म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील होत.[37]

भाऊराव लहानपणी गोरगरिबांचा मायबाप व समाजकंटकांचा कर्दनकाळ असलेल्या सत्याप्पा नावाच्या एका बंडखोर व्यक्तीच्या अंगाखांद्यावर खेळत. अन्यायाविरूद्ध बंड पुकारण्याचा प्रवृत्तीचे बाळकडू बाल भाऊरावांना सत्याप्पाकडून मिळाले होते. भाऊराव पुढे पुणे विद्यापीठाचे 'डॉक्टरेट' झाले. यातच भाऊरावांच्या शैक्षणिक कार्याचे मर्म सामावलेले आहे. तेव्हा कोल्हापूर हे संस्थान चळवळीचे माहेर घर बनले होते. भाऊरावांनी या चळवळीत तन-मन-धन वेचले. समाजप्रबोधनाची ही चळवळ त्यांना फार उपयोगी पडली. समाजाच्या उन्नतीसाठी, क्रांतीसाठी शिक्षणाची आवश्यकता पटली. अज्ञाणी जनतेला जर

चांगले दिवस यायचे असतील तर एकच रामबाण उपाय तो म्हणजे 'शिक्षण' या नवविचारांची बीजे त्यांच्या मनोभूमीत पक्की रूजली.

''खरा हिंदुस्थान खेड्यात दिसतो ---- महाराणी व्हिक्टोरिया हिला असे सांगावे की, गरीब जनता दारिद्र्याने पिचत असून त्यांना शिक्षणाची अत्यंत गरज आहे.'' महाराणी व्हिक्टोरियास हा निरोप देणारे महात्मा फुले म्हणजे भारतात स्त्री, बहुजनसमाजाच्या शिक्षणासाठी टाहो फोडणारे पहिले पुरष होत. त्यांचा वारसा पुढे चालविणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांच्या तालमीत भाऊराव वाढले. म्हणून पहिल्यांदा भाऊरावांनी महाराचा एक मुलगा घेऊन सातारला 'छत्रपती शाहू बोर्डिंग' सुरू केले. सत्यशोधक भाऊरावांना बहुजन समाजाच्या उंबरठ्यापर्यंत विद्या नेऊन पोहोचवायची होती. म्हणून भाऊराव कृतज्ञतेने म्हणत - ''जोतीरावांनी मला समाज सुधारणेचा कानमंत्र दिला. आण्णासाहेब शिंदे यांनी अस्पृश्यता-निवारण्याची आणि स्त्री-शिक्षणाची दीक्षा दिली. [38]

अशा प्रकारे त्यांच्या शैक्षणिक कार्याला सुरुवात झाली. शिक्षणाच्या अमृत सिंचनाखेरीज बहुजन समाजाचा पुनर्जन्म होणार नाही याची त्यांना खात्री पटली् म्हणून भाऊरावांनी ग्रामीण विभागात शिक्षणाची एक चळवळच सुरू केली. गावोगाव शाळा स्थापन केल्या, मग ते झोपडे असले तरी चालेल. काही करा पण शेवटी विद्येची व पोराची गाठ पडू द्या.''खऱ्या समाजोन्नतीसाठी शिक्षण हे एकच प्रभावी साधन आहे. अशी भाऊरावांची खात्री झाली होती.'' ते नेहमी म्हणत, ''केवळ पोपटपंची करणारे विद्यार्थी मला तयार करावयाचे नाहीत. त्यांच्याकरता माझी संस्था नाही. अन्यायाला ठोकणारा एक जरी विद्यार्थी या संस्थेत राहिला तरी मी माझ्या जीवाचे सार्थक झाले असे मानीन.''

भाऊरावांनी सातारा शहरात यवतेश्वराच्या पायथ्याशी धनिणीच्या बागेत आपल्या

शैक्षणिक कार्याची मुहुर्तमेढ रोवली. भाऊरावांनी चाळीस अजीव सेवकांना जमवून महाराष्ट्रभर शिक्षणप्रसाराची एक चळवळ उभारली. शिक्षणाला वंचित झालेल्या बहुजन समाजाला ज्ञान देण्यासाठी खेड्याकडे चला 'एवढेच न म्हणता प्रत्यक्ष पूर्ती करण्यासाठी सातारा येथे 'अध्यापक-विद्यालय व महाविद्यालय देखील स्थापन केले.[39]

कर्मवीर भाऊरावांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था म्हणजे रयतेच्या सर्वांगीण उन्नतीची संजीवनीच होय. आज अनेक प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, वसतिगृहे व महाविद्यालये केवळ मुलींसाठीही माध्यमिक विद्यालये, प्रशिक्षण अध्यापन विद्यालये स्थपिली आहेत. समाज उन्नतीच्या हेतूने चालविण्याचे हे यशस्वी कार्य रयत शिक्षण संस्था करीत आहे. [40]

एकंदरीत कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेले शैक्षणिक कार्य महान आहे. त्यांनी लावलेल्या या विशाल वटवृक्षाच्या असंख्य शाखा महाराष्ट्राच्या समाज जीवनात शैक्षणिक विचारांची क्रांती घडवून आणताना दिसून येतात.

अशा प्रकारे त्यांच्या कार्यावर फुलेंच्या विचाराचा पगडा दिसून येतो. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये 'शेतीला पाणी व मुलांना शिक्षण द्या' असे म्हणणारे, निद्रित समाजाला जाग आणणारे, शिक्षणाने नवसमाजाची उभारणी करणारे महात्मा जोतीराव म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तत्वावर बहुजन व स्त्री समाजाच्या शिक्षणासाठी टाहो फोडणारे पहिले पुरूष होत.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळाच्या सीमेवर उभा राहिलेले भाऊराव म्हणजे अज्ञानी समाज पुरूषाच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञानाचा गजर करणारे पहिले पुरूष. महात्मा जोतीरावांनी महाराष्ट्राच्या विशाल मनोभूमित शिक्षणबीजे पेरली. व कर्मवीर भाऊरावांच्या काळात त्याचा एक विशाल वटवृक्ष झाला.

स्वावलंबनाच्या शक्तीवर अपार विश्वास व समाजोन्नती विषयी अमाप आस्था यांच्या बळावर कर्मवीर भाऊरावांनी म्हात्मा जोतीरावांच्या नजरेपुढे तरळणारे स्वप्न साकार करनू दाखविले. महात्मा जोतीराव एक प्रेरणा तर कर्मवीर भाऊरावांनी स्थापन केलेली 'रयत शिक्षण संस्था' म्हणजे एक पूर्ती म्हणून सारा महाराष्ट्र ओळखतो.[41]

या रीतीने म. फुल्यांच्या स्फूर्तीने शिक्षणाचे पाऊल पुढे पडत गेले. आज त्यांनी सुरूवात केलेल्या स्त्री शिक्षणाचा परिणाम म्हणजे मुलींच्या शिक्षणसंख्येत वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. 1 वरुन) प्राथमिक स्तरावर स्त्री शिक्षणात नऊपट वाढ झाली आहे. 1950-51 मधील 5.4 दशलक्ष पासून 1993-94 मध्ये 46.4 दशलक्ष माध्यमिक स्तरावर तीस पटवाढ आहे. 1950-51मधील 0.5 दशलक्ष पासून 1993-94 मध्ये 15.7 दशलक्ष तर उच्चमाध्यमिक स्तरावरही याच प्रमाणात म्हणजे 0.2 ते 8.1 दशलक्ष अशी वाढ झाली आहे. यावरुन स्त्री शिक्षणात सुधारणा व वाढ झाली आहे असे दिसत असले तरी प्रत्यक्षात मुलामुलींच्या तुलनेत विषमता दिसून येते. 1950-51 मध्ये मुलांचे 13.8% तर मुलींचे 5.4% दशलक्ष हे प्रमाण होते. एकूण टक्केवारीच्या तुलनेने मुलींचे प्रमाण फक्त 28.1% तर 1993-94 मध्ये 42.9% झाले. याच कालावर्षीत माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण 16.1% ते 39.3% व उच्चमाध्यमिक चे प्रमाण 14.3% ते 34.6% होते. यावरुन प्राथमिक पेक्षा माध्यमिक शिक्षण घेताना व नंतर उच्च शिक्षण घेताना हे प्रमाण कमी कमी होत गेल्याचे आढळते. मुलींना शिक्षण घेताना अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्यांच्या संख्येत शिक्षण घेताना गळती होत असलेली दिसून येते. प्राथमिक स्तरावर 1993-94 मध्ये 39% तर उच्च प्राथमिक स्तरावर 57% घट झालेली आढळून येते. तसेच स्त्री पुरूषांच्या साक्षरतेचे प्रमाण पाहिल्यास पुरूषांच्या साक्षरतेचे प्रमाण हे स्त्रियांच्या साक्षरतेपेक्षा अधिक असलेले दिसून येते. (आलेख क्र. 2 वरुन) 1951 मध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण 8.86 व 1991 मध्ये 39.29 असलेले

आढळते.[42] आलेख क्र. 2 वरून 1951 पासून 1991 पर्यंतच्या पुरूषांच्या तुलनेने स्त्री साक्षरतेचे प्रमाण फारच कमी असलेले सहज लक्षात येते. यावरुन म. फुल्यांनी त्या काळात सुरू केलेल्या शिक्षणाच्या तुलनेने आज ज्या पटीत स्त्री शिक्षणाची वाढ व्हावयास पाहिजे तेवढी नाही. पुरूषांच्या तुलनेने ती 50% इतकीही नसल्याचे दिसते. आणि यामुळेच आजही त्यांनी पुरस्कारिलेल्या सक्तीच्या शिक्षणाचे विविध स्तरावर अवलंब करणे आवश्यक आहे असे म्हणणे गैर ठरणार नाही.


# SCHOOL ENROLMENT BY STAGES/CLASSES FOR BOYS AND GIRLS (1951-1993)

(In million)


| | Primary (I-V) | | | Middle (VI-VIII) | | | High/Hr. Sec. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Year | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total |
| 1950-51 | 13.8 | 5.4 | 19.2 | 2.6 | 0.5 | 3.1 | 1.3 | 0.2 | 1.5 |
| | | (28.1) | | | (16.1) | | | (14.3) | |
| 1960-61 | 23.6 | 11.4 | 35.0 | 5.1 | 1.6 | 6.7 | 2.7 | 0.7 | 3.4 |
| | | (32.6) | | | (23.6) | | | (18.2) | |
| 1970-71 | 35.7 | 21.3 | 57.0 | 9.4 | 3.9 | 13.3 | 4.9 | 1.7 | 6.6 |
| | | (37.4) | | | (29.3) | | | (25.9) | |
| 1980-81 | 45.3 | 28.5 | 73.8 | 13.9 | 6.8 | 20.7 | 7.6 | 3.2 | 10.8 |
| | | (38.6) | | | (32.9) | | | (29.4) | |
| 1990-91 | 58.1 | 41.0 | 99.1 | 20.9 | 12.4 | 33.3 | 14.0 | 6.9 | 20.9 |
| | | (41.4) | | | (37.4) | | | (33.0) | |
| 1991-92(P) | 59.2 | 42.4 | 101.6 | 21.4 | 13.0 | 34.4 | 14.2 | 7.0 | 21.2 |
| | | (41.7) | | | (37.8) | | | (33.0) | |
| 1992-93(P) | 60.5 | 44.9 | 105.4 | 23.7 | 15.0 | 38.7 | 15.0 | 7.7 | 22.7 |
| | | (42.6) | | | (38.8) | | | (34.3) | |
| 1993-94(P) | 61.8 | 46.4 | 108.2 | 24.2 | 15.7 | 39.9 | 15.3 | 8.1 | 23.4 |
| | | (42.9) | | | (39.3) | | | (34.6) | |

DROP-OUT RATES AMONGST GIRLS AND BOYS








DROP-OUT RATES AMONGST GIRLS AND BOYS



# LITERACY RATES IN IN 1951 - 1991



(3)



INFANT MORTALITY RATES
Persons
Males
Females
140
130
120
110
100
90
80
70
60
50
1978
1988
1989
1990
1991
1992
1993

## : संदर्भ सूची :


1. डॉ. गेल ऑम्व्हेट — लोकवाङ्मय गृह, मुंबई
प्रथम आवृत्ती, नोव्हें. 1990
पृ. क्र. 9, 10

2. अ. रा. कामत — शिक्षणाचा सामाजिक संदर्भ
समाज प्रबोधन संस्था, पुणे
पहिली आवृत्ती,पुणे
पहिली आवृत्ती, सप्टे. 1980
पृ. क्र. 95

3. संपादक हरि नरके — महात्मा फुले साहित्य और विचार
महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती
मुंबई, प्रथम आवृत्ती, 28 नोव्हे. 1993
पृ. क्र. 90, 91

4. संपादक हरि नरके — उपरोक्त पृ. क्र. 91

5. धनंजय किर — महात्मा जोतीराव फुले
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, 1992
पृ.क्र. 11, 12

6. कित्ता — उपरोक्त पृ. क्र. 12

7. मा. गो. माळी — क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले
आशा प्रकाशन, गारगोटी
द्वितीय आवृत्ती, 3 एप्रिल 1981

8. ग. बा. सरदार — महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार
ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ, मुंबई
द्वितीय आवृत्ती, नोव्हें. 1982
पृ. क्र. 47, 48

| | | |
|---|---|---|
| 9. | एकनाथ केशव घोरपडे | म. फुले चरित्र व कार्य<br>ठोकळ प्रकाशन, पुणे<br>चौथी आवृत्ती, 1966<br>पृ. क्र. 17, 18 |
| 10. | पंढरीनाथ सीताराम पाटील | महात्मा फुले<br>मनोविकास प्रकाशन, मुंबई<br>दुसरी आवृत्ती, 1989<br>पृ. क्र. 13 |
| 11. | धनंजय कि | उपरोक्त पृ. क्र. 28 |
| 12. | डॉ. मा. गो. माळी | उपरोक्त पृ. क्र. 26 |
| 13. | कित्ता | उपरोक्त पृ. क्र. 28 |
| 14. | एकनाथ केशव घोरपडे | उपरोक्त पृ. क्र. 17 |
| 15. | धनंजय किर | उपरोक्त पृ. क्र. 33 |
| 16. | डॉ. मा. गो. माळी | उपरोक्त पृ. क्र. 44, 45 |
| 17. | कित्ता | पृ. क्र. 45 |
| 18. | धनंजय कीर | उपरोक्त पृ. क्र. 30-34 |
| 19. | डॉ. मा. गो. माळी | उपरोक्त पृ. क्र. 45-46 |
| 20. | धनंजय किर | उपरोक्त पृ. क्र. 35 ते 37 |
| 21. | डॉ. मा. गो. माळी | उपरोक्त पृ. क्र. 46 |
| 22. | ग. बा. सरदार | उपरोक्त पृ. क्र. 64 |
| 23. | धनंजय कीर | उपरोक्त पृ. क्र. 46-47 |
| 24. | य. दी. फडके | महात्मा फुले समग्र वाङ्मय<br>साहित्य आणि संस्कृती मंडळ<br>प्रथम आवृत्ती, 1969<br>पृ. क्र. 253 |

| | | |
|---|---|---|
| 25. | कार्यकारी संपादक अब्दुल हमीद | महात्मा जोतिबा फुले<br>राष्ट्रचरित्रमाला<br>पुस्तक तिसरे मंच<br>प्रथम आवृत्ती, 1976<br>पृ. क्र. 20-21 |
| 26. | डॉ. मा. गो. माळी | उपरोक्त पृ. क्र. 48 |
| 27. | धनंजय किर | उपरोक्त पृ. क्र. 38 |
| 28. | कित्ता | पृ. 47-48 |
| 29. | कित्ता | पृ. क्र. 49-52 |
| 30. | संपादक हरि नरके | उपरोक्त पृ. क्र. 28 |
| 31. | प्रा. रा. तु. भगत | म. जोतीराव ते कर्मवीर भाऊराव<br>युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर<br>प्रथम आवृत्ती, 1973<br>पृ. क्र. 184-185 |
| 32. | प्रा. रा. तु. भगत | पृ. क्र. 186 |
| 33. | कित्ता | पृ. क्र. 188-189 |
| 34. | कित्ता | पृ. क्र. 193-194 |
| 35. | कार्य. संपादक अब्दुल हमीद | महर्षि धोंडो केशव कर्वे<br>राष्ट्रचरित्रमाला,<br>पुस्तक पाचवे, प्रथम आवृत्ती 1976<br>पृ. क्र. |
| 36. | प्रा. रा. तु. भगत | उपरोक्त पृ. क्र.192 |
| 37. | कित्ता | पृ.क्र.203 |
| 38. | कित्ता | पृ.क्र.206 व 207 |
| 39. | कित्ता | पृ.क्र.210 ते 214 |

40. कित्ता पृ.क्र.216

41. कित्ता पृ.क्र.220

42. Country Report, New Delhi, 23-8-1995 P.No.17 to 19

****